Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# फासिझम

**प्रा. तळणीकर एस.जी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
तोष्णीवाल महाविद्यालय,सेनगांव

**प्रास्ताविक :–**

19 व्या शतकात पश्चिमी देशात (लोकशाही) व्यक्तीस्वातंत्र्यवाद लोकप्रिय ठरला होता. इंग्लड मध्ये संसदिय लोकशाही रूजली होती. फ्रान्समध्ये स्वातंत्र्य, समता आणि न्याय या तत्वानी मुळ धरले होते. अमेरीकेच्या राज्यघटनेने व्यक्तीस्वातंत्र्य प्रस्थापित केले होते. बहूसंख्य देशातुन एकतंत्री कारभार नष्ट झाला होता. प्रोढ मताधिकाराच्या पुरस्काराबरोबर लोकशाहीचा पाया व्यापक झाला होता. एका बाजुला व्यक्तीस्वातंत्र्यवादी विचार बळावत होते तर दुस–या बाजुला सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा विचार बळावत होता.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी पहिले महायुध्द झाले. त्यानतंर अनेक देशाची अर्थव्यवस्था गडमडली. राजकीय स्थैर्य लोपले. प्रशासनातील भ्रष्टाचार वाढला. लोकांच्या जीवनातील नीतीमूल्ये ढासळली. सर्वत्र गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. इटलीत फासीस्ट तत्वज्ञान उदयाला आले तर जर्मनीत नाझी विचार बळावला. आशिया, आफ्रिका आणि मध्यपुर्वेतील काही देशात दक्षिण अमेरीका,जपान,अर्जेटींना इ.देशात या हूकूमशाही तत्वज्ञानाचा मोठा प्रभाव निर्माण झाला. या तत्वज्ञानाने व्यक्तीस्वातंत्र्यवादी लोकसत्ताक विचाराला धक्का दिला. जगाला युध्दाच्या खाईत लोटले. दूस–या महायुध्दात अपरिमीत हानी झाल्यामूळे याचा परिणाम म्हणून लोकमत फासिझम विरोधी बनले.

**अर्थ आणि व्याख्याः–** विसाव्या शतकात दुष्ट प्रवृत्तीवर आधारीत ज्या चळवळी होत्या त्यातील फासिझम ही एक प्रमुख चळवळ होय.

पहिल्या महायूध्दानंतर इटाली व जर्मनी या दोन देशात पराभूत राष्ट्रात परत त्या राष्ट्रातील लोकात प्रखर राष्ट्रभिमानाची भावना जागृत करण्याच्या दृष्टीने मुसोलिनी व हिटलर यांनी फासिझम व नाझीझम या स्वरूपाची विचारसरणी त्या देशातील लोकासमोर मांडली. फासीझम व नाझीझम ही विचारसरणी या दृष्टीने एकच होय. इटालीत त्याला फासीझम म्हणून ओळखले जाते व जर्मनीत त्याला नासीझम असे म्हणतात. फासिझम हा एक नकारात्मक स्वरूपाचा वाद आहे. फॅसिको (FASCEO) या शब्दापासुन फासीझम हा शब्द तयार झाला. फॅसिको म्हणजे काठयांचा गठठा व त्यामध्ये एक परशू असा त्याचा अर्थ आहे. फासीझमला इतिहास व सिध्दांत याची पूर्वपिठीका नाही. फासीझममध्ये दिसून येणारी प्रवृत्ती राजकारणात अनेक युगापासून चालत आलेली आहे व आजही ती दिसत आहे. फासीझम ही विसाव्या शतकातील या प्रवृत्तीची एक नवीन आवृत्ती होय. लोकशाहीला विरोध करणारा असा हा वाद असला तरी लोकसंघटना व चळवळ या तंत्राचा उपयोग फासीझमच्या पुरस्कर्त्यानी केला आहे. भांडवलशाहीला विरोध करणा–या काही घोषणा व विचार या वादाने समाजवादापासून उचलून कामगारांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न या वादाने केला आहे.

फासिझम हा अत्यांतिक राष्ट्रवाद, वंशवाद, लष्करवाद व साम्राज्यशाही याचा पूरस्कार करणारा वाद आहे. त्याचप्रमाणे राजकीय व्यवस्थेची रचना याबाबत तो सर्वकष स्वरूपाचा वाद आहे. मेकॅव्हली, हॉब्ज, हेगेल, नित्से, मार्क्स, सोरेल, मोस्का व पॅरेरो या विचारवंताच्या लिखाणातील सोयीस्कर असा दिसणारा भाग एकत्रित करूण फासीझमची मांडणी करण्यात आली आहे. फासिझमच्या अनेक व्याख्या आहेत. एकपक्षीय हूकूमशाहीव्दारा शासनसंस्था आणि समाज यांचे संघटन करणारे कठोर, राष्ट्रवादी, वंशश्रेष्ठत्वावर आधारित लष्करी आणि वसाहतवादी सर्वकष तत्वज्ञान म्हणजे फासिझम होय.

वरील व्याख्येवरून फासिझमचे खालील स्वरूप स्पष्ट होते.

1. फासिस्ट देशात एकच राजकीय पक्ष असतो.
2. त्या पक्षाच्या हाती सर्व सत्तासूत्रे असतात पक्षनेता हा हूकूमशहा असतो.
3. त्या पक्षाचे सरकारवर नियंत्रण असते.
4. तो पक्ष समाज नियंत्रीत करतो.
5. फासिस्ट विचार हा कठोर राष्ट्रवादी विचार आहे.
6. त्याला वांशिक श्रेष्ठता मान्य आहे. त्याचा पुरस्कार आणि प्रचार केला जातो.
7. सुसज्ज लष्कराची प्रचंड प्रमाणात उभारणी केली जाते.
8. फासिझम हा विचार वसाहतवादाचा पूरस्कार करतो अनेक छोटे देश बळाने जिंकून गूलाम बनवले जातात. या देशांचा आक्रमण हा निसर्ग सिध्द अधिकार मानला जातो.
9. समाज जीवनाच्या प्रत्येक सर्व अंगावर हूकूमशहाचे नियंत्रण असते.

फासिझम म्हणजे काय असे स्पष्ट करण्यापेक्षा फासिझम म्हणजे काय नाही हे स्पष्ट करणे अधिक सूलभ आहे. फासिझम हा विचार लोकशाही, व्यक्तीस्वातंत्र्यवाद, आंतरराष्ट्रवाद इ. विरोधी आहे. तो प्रामुख्याने अकरणात्मक विचार आहे. त्याला विचार म्हणणे कितपत योग्य आहे अशी शंका व्यक्त केली जाते. फासिझममध्ये विचारापेक्षा व्यवहार अधिक आहे. तत्वज्ञानापेक्षा कृतीला किंमत आहे. चर्चेपेक्षा आचार महत्वाचा आहे. फासिझम ही एक चळवळ आहे. त्या चळवळीचा उदय आधी झाला त्याचे तत्वज्ञान नंतर रचले गेले.

**फासिझमचा उदयः——**

पहिल्या महायुध्दानंतर इटलीत फासिझमचा उदय झाला. यूध्द जिंकूनही इटलीचा कोणताही फायदा झाला नव्हता. त्यामूळे सर्वत्र निराशा पसरली होती. इटलीची अर्थव्यवस्था कोलमडली होती. समाजात घोर विषमता होती. वस्तुचे भाव भडकले होते. वस्तु दूर्मिळ झाल्या होत्या. बेकारी वाढली होती. औद्योगिक अशांतता निर्माण झाली होती. संप आणि टाळेबंदी निर्माण झाली होती. (वाढली होती). चलनवाढ झाली होती. देशाचे अंदाजपत्रक हे तूटीचे होते. सरकारी अधिकारी भ्रष्ट बनले होते. सैनिक असंतूष्ट होते. अशा स्थितीत सरकारवरचा लोकांचा विश्वास उडाला होता. लोकांना मजबूत सरकार हवे होते. सत्तेचे केंद्रीकरण झाल्याशिवाय इटलीची स्थिती सूधारणार नाही. असे लोकांना मनोमन वाटू लागले होते. लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडाला होता. अशा स्थितीचा मूसोलीनीने फायदा उठवला. त्याच्या नेतृत्वाखाली 23 मार्च 1919 ला मिलान या ठिकाणी फासिस्ट चळवळ सूरू झाली. फासिस्ट पक्षाची उभारणी झाली. दिवसेंदिवस फासिस्ट पक्ष वाढू लागला. मार्च 1921 च्या निवडणूकीत त्याने

संसदेच्या 34 जागा जिंकल्या. आक्टोंबर 1922 मध्ये 'चलो रोम' घोषणा झाली. इटलीच्या राजाने मूसोलिनीला पाचारण करूण त्याच्या हाती सत्तासूत्रे सोपवली. 1925 मध्ये लोकशाहीची इतिश्री झाली व सर्वकष व्यवस्था निर्माण झाली. नाझी, जर्मनी व फासिस्ट इटली यांची मैत्री झाली. 1939 मध्ये दूसरे महायूध्द झाले. त्यात त्यांचा पराभव झाला. लोकांच्या फासिझमवरचा विश्वास उडाला. इटलीहून फासिझमचे उच्चाटन झाले. आता फक्त फासिस्ट तत्वज्ञानाचे अवशेष राहीलेले दिसतात.

मूसोलिनीने जेव्हा फासिस्ट पक्षाची उभारणी केली. तेव्हा त्याने सूसंगत तत्वज्ञान रचले नव्हते. परिस्थतीनूसार फासिस्ट विचारात परिवर्तन झाल्याचे दिसून येते. कारण सामान्य लोकांना राजकीय प्रश्नाचे आकलन होत नसते. असे त्याचे मत होते. सूरवातीला तो चर्चचा विरोधी होता. नंतर त्याने रोमन कॅथॉलिक चर्चचा सोयीस्कर रितीने पुरस्कार केला. नंतर कार्पोरेट राज्याची कल्पना अंमलात आणून सर्व उत्पादन साधणे राज्याच्या नियंत्रणाखाली आणली. 1919 ते 1924 या काळात फासिझममधील वैचारिक विसंगती दिसून येते. तथापि 1925 मध्ये मूसोलिनीचा सल्लागार सहकारी रोक्को याने फासिस्ट विचार सूस्पष्ट केला. जेन्टाइल आणि पामिरी यांनीही फासिझमची तात्वीक बैठक सांगितली. इटलीप्रमाणे, जपान, जर्मन, अर्जेंटीना इ. देशात फासिस्ट विचार उदयाला आला. नंतर तो अप्रिय ठरला व लोकांनी त्याचा त्याग केला. फासिस्ट विचार हा देशातील विशिष्ठ परिस्थतीत उदयाला येतो. सर्व देशात सारखी परिस्थती नसते तथापि फासिझमला उदयाला येण्याची काही ठळक कारणे सांगता येतील.

**1. राजकीय कारण :–**

ज्या देशात लोकशाही अयशस्वी होते. त्या देशात लोकांत विपूलतेची भावना निर्माण होते. अशा स्थितीत एखादा प्रभावी नेता परिस्थतीचा फायदा घेतो. लोकासमोर वेगळा कार्यक्रम ठेवतो. देशाच्या सामर्थ्यावर आधिारित यशाचे चित्र रंगवतो. राजकीय पक्ष उभा करूण त्याच्या मदतीने लोकांचा पाठींबा मिळवतो. आपल्या हाती सत्तेचे केंद्रीकरण करतो. त्या देशात लोकशाहीची परंपरा असते किंवा लोकशाही यशस्वी होते. त्या देशात फासिझम मूळ धरू शकत नाही. उदाहरणार्थ इंग्लडमध्ये फासिझमला स्थान मिळाले नाही. भारताने लोकशाहीचा स्वीकार केला आहे. लोकशाही अयशस्वी होणार नाही. याची काळजी घेतली पाहीजे.

**2.अर्थशास्त्रीय कारण :–**

इटली व जर्मनी या दोन देशांचा इतिहास असे दर्शवितो की, देशातील अर्थव्यवस्था कोलमडून पडली की, फासिझम येण्याला अनूकूल परिस्थती निर्माण होते. आर्थिकदृष्टया प्रगत असलेल्या देशात वफल्यातुन फासिझमकडे वाटचाल होते. मागासलेल्या देशात फासिझम आला नाही. चीन व रशियात साम्यवाद यशस्वी झाला. तेथे फासिझम मूळ धरू शकला नाही. उदयोगप्रधान देशात मजूर व भांडवलदार फासिस्ट चळवळीला उत्तेजन व मदत देतात. औद्योगिक शांततेसाठी त्यांचा अशा प्रकारचा प्रयत्न असतो.

**3. सामाजिक कारण:–**

समाजातील सर्वांणा फासिझमचे आकर्षन नसते. भांडवलदार व जमीनदार यांना शांतता हवी असते. त्यांना श्रमीकांच्या चळवळीची भीती वाटते. त्यांना अशा चळवळी पासून संरक्षण हवे असते. देशात लोकशाही परंपरा असली तर मात्र भांउवलदार व जमीनदार फासिस्टांना पाठींबा देत नाहीत. ते श्रमीकांबरोबर तडजोड करून शांतता प्रस्थापित करतात. लष्करी मनोवृत्तीचे लोक व सैनिक मात्र

कणखर सरकारवर विश्वास ठेवणारे असतात. ते फासिस्टांचे पाठीराखे असतात. फासिस्ट नेते मध्यमवर्गीयांना त्यांच्या पाठींब्यासाठी आवाहन करतात. त्यांची स्थिती अनिश्चित असते.

**4. मानसशास्त्रीय कारण :–**

समाजातील काही लोकांना स्वभावताच एकतंत्री राजवटीचे आकर्षन असते. सत्तेचे केंद्रीकरण झाल्याशिवाय समाजाचे प्रश्न सूटणार नाहीत. असे त्यांना वाटते. इंग्लंड मध्ये किंवा अमेरीकेत फासिझम येउ शकत नाही. कारण बहूसंख्य लोक स्वभावतःच सत्तेच्या केंद्रीकरणाच्या विरूध्द आहेत. समाजातील काही लोकांना जबाबदारी नको असते. परावलंबन ही त्यांची प्रवृत्ती असते. फासिझममध्ये सत्ता मूठभर लोकांच्या हाती असते. त्यांच्यावर सर्व जबाबदारी असते. परावलंबी वृत्तीचे लोक फासिस्टांना पाठींबा देतात. काही लोक फासिस्ट नेतृत्वाने प्रभावित होतात. त्यांच्या व्यक्तीमत्वामूळे ते फासिझमला पाठींबा देतात. फासिस्ट नेते आपल्या भाषणातून लोकांच्या भावना चेतवतात . त्याचाही समाजातील काही लोकावर परिणाम होतो.

**5. तात्वीक कारण :–**

यूरोपातील अनेक विचारवंताच्या विचारातुन फासिझमला खादय पूरविले आहे. काही विचारवंतानी व्यक्तीपेक्षा राज्य श्रेष्ठ असल्याचे सांगितले. व्यक्तीची राज्यावर निष्ठा का असावी याचे स्पष्टीकरण दिले. डार्विन सारख्या विचारवंताने असे सांगितले की, जगाच्या कोलाहालात केवळ समर्थच जगू शकतात. काही विचारवंतानी वांशिक श्रेष्ठतेची कल्पना उचलून धरली. या सर्व विचारामूळे फासिझमला काही प्रमाणात वैचारीक आधार मिळाला. फासिझम हे तत्वज्ञान नाही तो एक व्यवहार आहे. मूसोलीनी स्वतःच म्हणत असे की, आम्हाला चर्चा व सिध्दांताच्या ढगातून बाहेर पडावयाचे आहे. आपण राज्य, राष्ट्र, समाज यांच्यात फरक करतो परंतू मूसोलीनीच्या मते त्या संकल्पना एकच आहेत. त्यांचा अर्थही एकच आहे.

**सारांशः**

फासिझम व नाझीझम पहिल्या महायुध्दाच्या मध्यंतरात अंतराळात जसा धूमकेतू चमकून जातो व नाहीसा होतो तशाच प्रकारे अनुक्रमे इटलित व जर्मनीत फासिझम व नाझीझम यांचा दोन महायुध्दाच्या मध्यंतरात फार मोठा प्रभाव निर्माण झाला. इटली व जर्मनी ही बलाढय राष्ट्रे मानली गेली. पण दूस–या महायुध्दात हया दोन्हीही राष्ट्रांचा अतिशय दारूण असा पराभव झाला. मुसोलिनीच्या प्रेताला इटलीमधील लोकांनी लाथा बूटांचा मार दिला तर जर्मनीत हिटलरला आत्महत्या करावी लागली. पाशवी शक्तीच्या आधारावर निर्माण झालेली राष्ट्रशक्ती फार काळ टिकू शकत नाही. हे इतिहासाने सिध्द केले आहे. हया दोन्हीही विचारसरणी म्हणजे मानवजाती व तिची संस्कृती यावर भयानक संकट होय असे सर्वत्र मानन्यात आले. म्हणूनच दूस–या महायुध्दात हया दोन्ही राष्ट्रांना पराजित करण्यासाठी जगातील सर्व राष्ट्रांनी अमेरिका, इंग्लंड या दोस्त राष्ट्रांना सर्वोत्तपरी साहय केले.

**संदर्भ :**

1) राजकीय विचारधारा – डॉ. बी.वाय. कुलकर्णी, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद.1997
2) राजकीय विचारप्रणाली – डॉ. ज.रा. शिंदे, मराठवाडा पब्लिशिंग हाउस, औरंगाबाद 1997
3) आधुनिक राजकीय विचारप्रणाली– कुलकर्णी अ.ना., विद्या प्रकाशन, नागपूर 1997
4) राजकीय विचारप्रणाली– पाटील संतोष, शुभम प्रकाशन, लातुर 2005